# विशेष अहवाल
# (SPECIAL REPORT)

प्रति, :- मा. महासंचालक, ला.प्र.वि.,महाराष्ट्र राज्य मुंबई,
माहीतीस्तव :- मा. पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि, औरंगाबाद, मा.अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि.औरंगाबाद.
पासुन :- पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि,जालना.

**जा.क्र.सापळा/000/जालना/2021 - 545 दिनांक :-03.03.2021**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | युनीटचे नांव | :- | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना. |
| 2 | तक्रारदाराचे नांव व पत्ता | :- | श्री. शैलेश उध्दवराव जोगदंड, वय 38 वर्ष व्यवसाय नोकरी पोलीस उप निरीक्षक, नेमणुक पोलीस ठाणे देवगाव रंगारी, औरंगाबाद ग्रामीण |
| 3 | पो ठाणे गुरनं व कलम | :- | पोलीस ठाणे देवगाव रंगारी जि औरंगाबाद ग्रामीण गुरनं 21/2021 कलम 7 अ लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम 1988 |
| 4 | आलोसे यांचे नांव, पद, नेमणुकीचे ठिकाण व वर्ग | :- | श्री. गोकुळ बाळासाहेब सुर्यवंशी वय 40 वर्ष व्यवसाय वाळु वाहतुक रा. बळेगाव ता. वैजापुर जि. औरंगाबाद (खाजगी इसम) |
| 5 | घटनेचे ठिकाण | :- | पोलीस ठाणे देवगाव रंगारी जि औरंगाबाद ग्रामीणचे आवारामध्ये |
| 6 | गुन्हा घडला ता.वेळ | :- | दि. 02.03.2021 रोजी 16.30 वाजेचे सुमारास |
| 7 | गुन्हा दाखल ता.वेळ | :- | दि. 02.03.2021 रोजी 20.38 वाजता |
| 8 | आरोपी अटक ता.व वेळ | :- | दि. 02.03.2021 रोजी 00.50 वाजता |
| 9 | लाचेची रक्कम | :- | 25,000/- रुपये लाचेची रक्कम ॲन्थ्रासिन पावडर लागलेली . |
| 10 | लाचेचे कारण | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी तक्रारदार हे पोउपनि असुन ते त्यांचे शासकीय कर्तव्य बाजवत असतांना यातील आरोपी वाळु वाहतुकदार श्री. गोकुळ बाळासाहेब सुर्यवंशी (खाजगी इसम) याने पो. ठाणे देवगाव रंगारी, औरंगाबाद ग्रामीण हद्दीतुन त्याचे दोन टेम्पो अवैध्य वाळु वाहतुकीवर चालवु देण्यासाठी तक्रारदार पोउपनि/ श्री. शैलेश उध्दवराव जोगदंड नेमणुक पोलीस ठाणे देवगाव रंगारी, औरंगाबाद ग्रामीण यांची इच्छा नसतांना त्यांना 25,000/- रुपयांची लाच देत असतांना रंगेहाथ पकडले. |
| 11 | आलोसेंचे सक्षम अधिकारी | :- | ------ |
| 12 | तपासी अमंलदार | :- | श्री. एस.एस.शेख, पोलीस निरीक्षक, ला.लु.प्र.वि.जालना. |

<u>खुलासा :-</u> याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार श्री. शैलेश उध्दवराव जोगदंड, वय 38 वर्ष हे पोलीस ठाणे देवगाव रंगारी जि. औरंगाबाद ग्रामीण येथे पोलीस उप निरीक्षक म्हणुन नेमणुकीस असुन त्यांनी तक्रार दिली की, ते पोलीस ठाणे देवगाव रंगारी, औरंगाबाद ग्रामीण हद्दीत दैनंदीन शासकीय कर्तव्य बजावुन पोलीस ठाणे हद्दीतुन होणारे अवैध्य वाळु वाहतुकीविरुध्द कार्यवाही करीत असल्याने आरोपी नामे श्री. गोकुळ बाळासाहेब सुर्यवंशी वय 40 वर्ष व्यवसाय वाळु वाहतुक रा. बळेगाव ता. वैजापुर जि. औरंगाबाद याने पो. ठाणे देवगाव रंगारी, औरंगाबाद ग्रामीण हद्दीतुन त्याचे दोन टेम्पो अवैध्य वाळु वाहतुकीवर चालवु देण्यासाठी पोउपनि/ श्री. शैलेश जोगदंड यांना प्रत्येकी 25,000/- रुपये प्रमाणे लाच घेण्याचा तगादा लावु लागला, परंतु तक्रारदार पोउपनि/ श्री. शैलेश जोगदंड यांना आरोपीकडुन लाच घेण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन आज दि. 02.03.2021 रोजी पडताळणी केली असता वाळु वाहतुकदार श्री. गोकुळ बाळासाहेब सुर्यवंशी वय 40 वर्ष व्यवसाय वाळु वाहतुक रा. बळेगाव ता. वैजापुर जि. औरंगाबाद (खाजगी इसम) याने पो. ठाणे देवगाव रंगारी, औरंगाबाद ग्रामीण हद्दीतुन त्याचे दोन टेम्पो अवैध्य वाळु वाहतुकीवर चालवु देण्यासाठी तक्रारदार पोउपनि/ श्री. शैलेश उध्दवराव जोगदंड नेमणुक पोलीस ठाणे देवगाव रंगारी, औरंगाबाद ग्रामीण यांची इच्छा नसतांना त्यांना 25,000/- रुपयांची लाच देत असतांना श्री. गोकुळ बाळासाहेब सुर्यवंशी यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालनाचे पथकाने पोलीस ठाणे देवगाव रंगारी, औरंगाबाद ग्रामीण चे आवारात रंगेहाथ पकडले.

आरोपी नामे श्री. गोकुळ बाळासाहेब सुर्यवंशी वय 40 वर्ष व्यवसाय वाळु वाहतुक रा. बळेगाव ता. वैजापुर जि. औरंगाबाद (खाजगी इसम) याचे विरुध्द पोलीस ठाणे देवगाव रंगारी, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

पोलीस उप अधिक्षक
लाप्रवि जालना